I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 272-276
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# अशोक पवार आणि भटक्यांचे जीवन

अरूण राऊत व रविंद्र मुरमाडे
विश्‍वशांती कनिष्ठ महा. सावली
डॉ. खत्री महा. तुकुम (चंद्रपूर)
*Corresponding Author: ambadastirankar@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :-**

अशोक पवार बालपणी घरच्या दारिद्रयामुळे भिक मागून जीवन जगले. अतिशय बिकट परिस्थितीत आपले शिक्षण एम.ए. पर्यंत पूर्ण केले. वडिलासोबत गावोगावी उदरनिर्वाहाकरीता भटकंती करावी लागत असल्यामुळे त्यांचे बालपण अत्यंत हलाखीत गेले. भारतीय समाजव्यवस्थेने बहिष्कृत केलेल्या भटक्या विमुक्तांचे वास्तववादी चित्रण त्यांच्या लेखनात पाहायला मिळते. त्यांचे साहित्य दलित वळणावरचे आहे. त्यांनी मुख्यतः भटक्या जामतीच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्यांच्या लेखनात वेदना ओतप्रेत भरलेल्या आहेत. त्यांच्या साहित्य कृतीची दखल घेत त्यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कार पण प्राप्त झालेले आहेत. अशोक पवारांचे कांदबरी विश्व समाजाला एक वेगळी दिशा देणारे आहे. माणसाने माणसाशी अगदी माणसासारखं वागावं एवढीच त्यांची प्रबळ इच्छा आहे. अशोक पवार आपल्या कांदबरीतून आपल्या जमातीतील चालीरिती, रूढी, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा, त्यांचे प्रभावी चित्रण करतांना दिसतात. बदलते संदर्भ लक्षात घेता, वर्तमानात आजही कुठेतरी मानवाचे जीवन अनेक अंशाने व्यतित झालेले दिसते. स्वातंत्र्याला पाऊनशे वर्षे उलटली तरी आजही भटक्या जमाती सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतीक दृष्टया मागासलेले आहेत. भारतीय संविधानाने सर्वांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिलेला आहे. पण भटक्या विमुक्त जमाती आजही त्या अधिकारापासुन कोसोदूर आहेत. माणूस म्हणून जगण्याचे कुठलेच हक्क त्या भटकंती जमातीच्या वाटयाला आजही आलेले नाहीत. आयुष्यभर संघर्ष करीतच त्यांना जीवन जगावे लागते. त्यांच्या पोटाचे प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत. सतत पोलीसांचा मार आणि स्त्रियांचे अब्रुचे धिंडवडे सारेच कसे अमानवीय आणि विदारक आहे.

**बीजसंज्ञा :-** जीवनसंघर्ष, दलित साहित्य, भटक्याजमाती, साहित्यकृती, वेदना, आक्रोश वास्तव आणि आपली जबाबदारी.

## प्रस्तावना :

बिराडकार अशोक पवार यांचा जन्म १ जुलै १९७२ मध्ये भटक्यांच्या पालात येनोली ता. जिंतुर जि. परभणी येथे झाला. अठराविश्वे दारिद्रयामुळे बालपणी भिक मागुन कसंबसं जीवन कंठावे लागे. रात्रपाळी शाळेतुन ४ थी पास झाले. वसतीगृहात राहून व सुट्टयामध्ये रोजमजूरी, हॉटेलवर वेटरकीचे काम करून १० वी प्रथम श्रेणीत पास झाले. वडिलासोबत उदरनिर्वाहा करीता गावोगावी भटकंती करावी लागत असल्यामुळे त्यांचे बालपण अत्यंत हलाखीचे गेले. पुढील शिक्षण त्यांनी एम.ए. पर्यंत घेतले. १९६० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून ते आजतागायत या समकालीन कालखंडात निर्माण झालेले कांदबरी वाङ:मय विशेषत्वाने भटक्यांच्या जीवनाचे विदार वास्तव व जगण्यासाठीचा करावा लागणारा संघर्ष, गुन्हेगार म्हणून समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण, आज इथं तर उद्या तिथे अशी

भटकंती जीवन अशोक पवारांच्या वाटेला आले. भारतीय समाजव्यवस्थेने बहीष्कृत केलेल्या भटक्या विमुक्तांचे वास्तववादी चित्रण 'बिराड' या आत्मकथनाच्या रूपाने मांडले आहे.

**दलीत साहित्याच्या पाऊलखुणा :**

अशोक पवार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन सामाजिक अंगाने विचार करू लागले. म्हणतात ना की, जगण्याचे संदर्भ बदलले की माणसात परिवर्तन घडून येते, नेमके हेच परिवर्तन भटक्या समुहातून स्वत:ला घडवित नवी वाट चोखाळणारे अशोक पवार यांनी आपल्या जीवनात वाचन व लेखनाला फार महत्व दिले. त्यांचे साहित्य हे दलित साहित्याच्या वळणावरचे आहे. त्यांनी भटक्या जमातीच्या जीवनावर प्रकाश टाकला. ''भटक्या जमातीच्या श्रमावर, अंगमेहनतीवर या देशातील गावे उभी राहीली. बेलदार जमातीच्या चूनामातीच्या कौशल्यातून गावाला गावपण मिळाले. वडाराच्या छन्नी हातोडीने दगडाचे चाक तयार करून समाज जीवनाला गती दिली. जमिनीच्या पोटातून दगड काढुन या देशात किल्ले, चिरेबंद राजवाडे व ताजमहाल, अजिंठा, एलोरा येथील जगप्रसिध्द लेण्या, खजूराहोची शिल्पकला या सारख्या कला कौशल्यांची जगाला ओळख करून देणारे आणि दगडाला देवपण प्राप्त करून देणारे वडार व पाथरट जमाती मात्र उपेक्षितच राहिल्या'' अशोक पवार यांचे 'बिराड' आत्मकथन एका वेगळया उंचीचे आहे. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीचा प्रत्यय बिराड आत्मकथनात जाणवतो.

**दर्जेदार साहित्यकृती :**

अशोक पवारांच्या लेखनाला एक वेगळा दर्जा आहे. त्यांच्या लेखनात 'वेदना' ह्या ओतप्रेत भरलेल्या आहेत. स्वतंत्र भारताचे आम्ही स्वतंत्र नागरिक म्हणून आम्ही मिरवणारे माणसं, क्षणभर भटक्या लोकांचे जीवन बघीतल्यावर अंगावर काटा येतो. खरच ते या देशाचे स्वतंत्र नागरिक आहेत कां हा प्रश्न पडतो. अशोक पवारांनी त्यांच्या लेखनातून वास्तव आणि विदारक चित्र समाजापूढे मांडले आहे. त्यांच्या या साहित्यकृतीची दखल घेत त्यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झालेली आहेत. त्यामध्ये अत्यंत मानाचा राष्ट्रीय दर्जाचा समजला जाणारा संस्कृती प्रतिष्ठान नवी दिल्लीचा संस्कृती पुरस्कार 'बिराड' व 'इळनमाळ' या लेखनासाठी प्राप्त झालेला आहे. शिवाय विविध विद्यापीठात ती अभ्यासक्रमाला देखिल आहेत. एकूनच अशोक पवारांचे कांदबरी विश्व समाजाला एक वेगळी दिशा देणारे आहे. माणसाने माणसाला माणूस म्हणून जवळ घ्यावे एवढीच त्यांची अपेक्षा आहे. अशोक पवार यांचे वाड:मयीन व्यक्तीमत्व अतिशय बहरले असून त्यांच्या कांदबरी मधून पदोपदी आपणाला समाज सजग करण्याची धडपड

दिसून येते. समाजाचे आपण देणे लागतो या जाणिवेतून समाजातील दु:ख, व्यथा, वेदना, श्रध्दा, अंधश्रध्दा, ग्रामिण जीवन, भटक्यांचे जीवन ही त्यांच्या कांदबरीतील बलस्थाने असून ती समाजाला दिशा देणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपेक्षीत नवसमाज रचना निर्माण करण्यासाठी त्यांची लेखणी सरसावतांना दिसते.

**अशोक पवार यांच्या साहित्यातील वेदना व वास्तव :**

वर्तमान काळाचा विचार करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. सामाजिक अंगाने समाजाचे वास्तव मांडू लागले. आपल्या भावनांना मोकळीकता देऊ लागले. शेकडो वर्षे समाजापासून दूर राहिलेला उपेक्षित भटक्या जमातीतील लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून लिहू लागला. त्यामध्ये अशोक पवार आपल्या कांदबरीतून आपल्या जमातीतील चालीरिती, रूढी, प्रथा, परंपरा, श्रध्दा, अंधश्रध्दा यांचे प्रभावी चित्रण करतांना दिसतात. ‘‘भटकंतीमुळे आलेली अस्थिरता संपवून अस्तीत्वाचा शोध घेण्यासाठी प्रस्थापित समाजाने गुन्हेगार म्हणुन मारलेला शिक्का पुसून टाकण्यासाठी भारतिय लोकशाहीत इतराप्रमाणे नागरिक म्हणून मुलभूत हक्क मिळवण्यासाठी लेखन रूपाने केलेला अविष्कार म्हणजे भटक्या विमुक्तांची वाड:मयीन चळवळ होय.’’२ बदलते संदर्भ लक्षात घेता, वर्तमानात आजही कुठेतरी माणवाचे जीवन अनेक अंगाने व्यतीत झालेले दिसते. स्वातंत्र्याला पाऊनशे वर्षे उलटली तरी आजही भटक्या जमाती सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतीक दृष्टया मागासलेले आहेत. त्यांच्या जगण्याचे संदर्भ कुठेतरी बदललेली दिसतात. भारतीय संविधानाने सर्वांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क आणि अधिकार दिलेला आहे. पण भटक्या विमुक्त जमाती आजही या अधिकारापासून कोसो दूर आहेत. प्रा. प्रविण बनसोडे म्हणतात, ‘‘विषम समाज व्यवस्थेने मारलेला गुन्हेगारीचा शिक्का नशिबाचे भोग समजून स्विकारत अनेक भटक्या जमातींचा प्रवास अजुनही सुरूच आहे. हजारो वर्षापासून सुरू असलेल्या भटक्या विमुक्तांचा हा प्रवास अतिशय अमानवी, लाचारीने व्याप्त आहे. बेलदार ही भटक्या पैकी एक जमात. दगडी चिरे फोडण्याचे परंपरागत काम करणारी ही जमात आपल्या दारिद्राला स्विकारत जगण्यासाठी दोन होत करत, कधी स्वत:ला दोष देत, कधी नशिबाला शिव्या देत प्रवास करते. आपले ‘बिराड’ इकडून तिकडे, तिकडून इकडे हलवत आयुष्याशी संघर्ष करत, श्रध्दा, अंधश्रध्दांना शरण जात भटक्यांची भटकंती सतत सुरूच आहे. अशोक पवार हे या ‘बिराड’ चे सहप्रवाशी. ’’२ अशोक पवारांनी त्यांच्या कांदबरीतून मांडलेले भटक्यांचे चित्र खरोखरच वेदना

देणारे वास्तव आहे. 'माणूस' म्हणून जगण्याचे कुठलेच हक्क त्या भटकंती जमातीच्या वाटयाला आजही आलेले नाहीत. राहण्यासाठी कुठेही स्वत:चे पक्कं घर नाही. पोटासाठी सतत गावोगाव भटकंती करायची. गावात चोरी कोणीही केली तरी शेवटी आळ यांच्यावरच, प्रत्येक पातळीवर त्यांचे शोषण चालत असते. आयुष्यभर संघर्ष, संघर्ष आणि फक्त संघर्ष. अशोक पवार यांनी भटक्यांचे जीवन अगदी जवळून पाहिलेले आहे. त्यांच्या वेदना, आक्रोश, भूक अगदी जवळून न्याहाळलेल्या आहेत. अशोक पवार त्यांच्या वेदना मांडतांना म्हणतात, 'अमरावती बडनेरा रेल्वे बाहेर शे-दिडशे कुटुंब गेल्यापाच सात वर्षापासून बघतो मी. उघडयावर राहतात. रेल्वे चौकीदार सुध्दा पाणी पावसात त्यांना येऊ देत नाही. जात पारधी सांगीतली की चोरच समजतात. ते काय खात असतील, कसे जगत असतील? पावसाळा, हिवाळा, उन्हाळयात त्यांच्या निवाऱ्याची काय व्यवस्था असेल, याचा कधी सुजाण समाजाने केला विचार? त्यांचा सुक्ष्मपणे विचार केला, त्यांच्या सारखा होऊन त्यांच्या राहीलो. बालपणापासून सुध्दा त्यांना बघत आलो, त्यांचे जीवन सुजाण समाजाला कळावे, त्यांना माणूस म्हणुन जवळ घ्यावे म्हणून मांडली त्यांच्या दु:खाच्या अनुभवाची मालिका 'दर कोस दर मुक्काम' ही कांदबरी' स्वातंत्र्याला पाऊनशे वर्षे लोटूनही पारध्याच्या जीवनात पाहिजे त्या प्रमाणात बदल झालेला नाही. त्यांच्या पोटाचे प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत. सतत पोलिसांचा मार आणि स्त्रियांच्या अब्रुचे धिंडवडे सारेच कसे अमानवीय आणि विदारक आहे. हे भटकंती पारधी लोक स्वातंत्र्याच्या मुख्य प्रवाहापासून आजही कोसोदूर आहेत. त्यांना माणूस म्हणून जगण्याचे हक्क आणि सन्मानपूर्वक वागणूक देणेहे तुमची माझी जबाबदारी आहे.

**समारोप :**

आपला देश १५ ऑगष्ट १९४७ साली स्वतंत्र झाला. या देशातील प्रत्येक नागरिक स्वतंत्र झाला. परंतु भटकंती करणारे पारधी लोकांच्या वाटयाला कोणते स्वातंत्र आले? घटनेने सर्वांना मुलभूत अधिकार प्रदान केले, पण ह्यांच्या वाटयाला कोणते मुलभूत अधिकार आले? अशोक पवारांनी कांदबरीच्या माध्यमातून भटक्याचे जीवन समाजापूढे मांडले. सृजन नागरिकांना विचार करायला भाग पडले. कानाने ऐकीव माहीती पेक्षा प्रत्यक्ष डोळयाने पाहीलेली आणि स्वत: अनूभवलेली गोष्ट अधिक महत्वाची असते. अशोक पवारांनी स्वत: ही व्यथा अनुभवलेली आहे म्हणूनच ते भटक्यांचे जीवन एवढया प्रभावाने मांडू शकले. तुमच्या डोळयासमोर काय दिसते याच्या पेक्षा तुमच्या डोळयाने तूम्ही नेमके काय बघता हे जास्त महत्वाचे असते. अशोक पवारांनी प्रत्यक्ष आपल्या डोळयाने जे पाहिले, जे विश्व ते अनूभवले

त्यांचे ज्वलंत विदारक चित्र कांदबरीच्या माध्यमातून त्यांनी मांडले.

**निष्कर्ष :**

भटकंती लोक सुध्दा आपले बांधव आहेत. ते सुध्दा याच भारत देशाचे नागरिक आहेत. त्यामुळे त्यांना सर्वच मुलभूत अधिकार मिळायला हवे. समाजाने त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलने काळाची गरज आहे. त्यांना स्वातंत्र्याच्या मुख्य प्रवाहात आणण्याची पवित्र जबाबदारी आपली सर्वांचीच आहे.

**संदर्भ :-**

बावणे लिनकुमार – भटक्यांचे भग्न संसार व संस्कृती विकास प्रिंटर्स चंद्रपूर प्र.आ. १९९२ पृ. २३

मोरे गिरीष – भटक्या विमुक्तांचे साहित्य प्र.आ. २०१० पृ. २१८

गारोडे प्रमोद – ‘बिराड’ चितन आणि समिक्षा

कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद प्र.आ. २०११ पृ. ६२

पवार अशोक – ‘साधना’ (आसपास) २७ फेब्रुवारी २०१० पृ. १०